# मुंबई विद्यापीठ

Email-arelection@election.mu.ac.in
Tel No. 022-22708710/98

क्र. नि.वि./(अधिसभा(प.शि.))/232/२०१५.

परिपत्रक :-

मुंबई विद्यापीठाच्या विभागांचे विभागप्रमुख, संलग्न/संचालित/स्वायत्त महाविद्यालयाचे प्राचार्य, मान्यताप्राप्त संस्थाचे संचालक, स्वायत्त संस्था/महाविद्यालये, शिक्षण संस्थेचे अध्यक्ष/सचिव, प्राध्यापक-नि-संचालक, दूर व मुक्त अध्ययन संस्था यांना या परिपत्रकाद्वारे असे सूचित करण्यात येते की, पदव्युत्तर शिक्षक मतदार संघासाठी अर्ज भरताना खालील व्याख्या लक्षात घेऊन अर्ज सादर करावेत.

पदव्युत्तर शिक्षक व्याख्येसंदर्भात विद्यापीठ सुधारणा अधिनियम स्पष्टीकरण या विषयाचे उच्च व तंत्र शिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडुन प्राप्त झालेले पत्र क्र. पुवि २०००/(३३५/२०००) विशि-३, दिनांक १ फेब्रुवारी, २००१ आपल्या निर्देशनास आणू इच्छितो.(प्रत संलग्न.)

**पदव्युत्तर शिक्षक व्याख्या** – "पदव्युत्तर शिक्षक म्हणजे विद्यापीठातील पदव्युत्तर विभागामध्ये जो पूर्ण वेळ अधिव्याख्याता /प्रपाठक/प्राध्यापक म्हणून कार्यरत आहे. तसेच विद्यापीठांशी संलग्नीत महाविद्यालयांमध्ये पदव्युत्तर विभाग असल्यास व त्या पदव्युत्तर विभागांतील शिक्षक जर विद्यापीठ अनुदान आयोगाने ठरवून दिलेल्या निकषानुसार पदव्युत्तर विभागामध्ये पूर्णवेळ अधिव्याख्याता/प्रपाठक/प्राध्यापक म्हणून कार्यतर असेल व विद्यापीठाने पदव्युत्तर व महाविद्यालयातील पदव्युत्तर विभागातील शिक्षकास पदव्युत्तर शिक्षक म्हणून मान्यता दिली असेल तर त्यास पदव्युत्तर शिक्षक समजण्यात यावे''.

**Definition of Post Graduate Teacher** :- "A Post-graduate teacher includes a teacher who is a full-time Professor, Associate Professor, Assistant Professor, Reader and Lecturer in the Post- graduate departments of the University and a full time teacher who is engaged in teaching at the Post.graduate level in the affiliated colleges and recognized Institutions, as per the norms laid down by the University Grants Commission and whose appointment is approved by the University as a Post-graduate teacher".

मुंबई - ४०० ०३२.
दिनांक -22जुलै, २०१५.

कुलसचिव

प्रति,

मुंबई विद्यापीठाच्या विभागांचे विभागप्रमुख, संलग्न/संचालीत/स्वायत्त महाविद्यालयाचे प्राचार्य, मान्यताप्राप्त संस्थाचे संचालक, स्वायत्त संस्था/महाविद्यालये, संचालित महाविद्यालयांचे प्राचार्य, शिक्षण संस्थेचे अध्यक्ष/सचिव, प्राध्यापक-नि-संचांलक, दूर व मुक्त अध्ययन संस्था, समन्वयक, रत्नागिरी उपकेंद्र आणि समन्वयक, ठाणे उपकेंद्र.

---

क्र.नि.वि./232/२०१५. मुंबई - ४०० ०३२. दिनांक -22 जूलै, २०१५.

प्रत माहितीकरिता रवाना :-

१) परीक्षा नियंत्रक,
२) नियंत्रक, मुद्रण व लेखन सामुग्री
३) समन्वयक, विद्यापीठ संगणक केंद्र,
४) उपकुलसचिव, (सा.प्र.वि) डॉ. बाबासाहेब आंबेडकर भवन विद्यानगरी,
५) उपकुलसचिव, (वित्त व लेखा) परिक्षाभवन, विद्यानगरी,
६) उपकुलसचिव (वित्त व लेखा) फोर्ट,
७) सहायक कुलसचिव, (सा.प्र.वि) फोर्ट,
८) सहायक कुलसचिव, रत्नागिरी उपकेंद्र रत्नागिरी,
९) सुरक्षा अधिकारी, फोर्ट व विद्यानगरी परिसर,

(Election) MR 912

महाराष्ट्र शासन

क्रमांक - पुवि २०००/(३३५/२०००) विशि -३
उच्च व तंत्र शिक्षण विभाग
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक : १ फेब्रुवारी २००१

प्रति,

कुलसचिव मुंबई
सर्व विद्यापीठे

UNIVERSITY
08 FEB 2001
OF MUMBAI

विषय : विद्यापीठ सुधारणा अधिनियम -स्पष्टीकरण

महोदय,

विद्यापीठ सुधारणा अधिनियमासंदर्भात उपस्थित केलेल्या मुद्यांबाबतचे स्पष्टीकरण खालीलप्रमाणे आहे :

१) पदव्युत्तर शिक्षकांची व्याख्या- पदव्युत्तर शिक्षक म्हणजे विद्यापीठातील पदव्युत्तर विभागांमध्ये जो पूर्ण वेळ अधिव्याख्याता / प्रपाठक / प्राध्यापक म्हणून कार्यरत आहे. . तसेच विद्यापीठांशी संलग्नीत महाविद्यालयांमध्ये पदव्युत्तर विभाग असल्यास व त्या पदव्युत्तर विभागातील शिक्षक जर विद्यापीठ अनुदान आयोगाने ठरवून दिलेल्या निकषानुसार पदव्युत्तर विभागामध्ये पूर्णवेळ अधिव्याख्याता / प्रपाठक /प्राध्यापक म्हणून कार्यरत असेल व विद्यापीठाने पदव्युत्तर व महाविद्यालयातील पदव्युत्तर विभागातील शिक्षकास पदव्युत्तर शिक्षक म्हणून मान्यता दिली असेल तर त्यास पदव्युत्तर शिक्षक समजण्यात यावे.

२) अभ्यासमंडळाचे अध्यक्षत्व - जर एखादी व्यक्ती त्याच्या पूर्वीच्या विषयाव्यतिरिक्त त्या फॅकल्टीमधील इतर विषयांकरीता निवडणूक लढवू शकत असेल तरीही इतर फॅकल्टीजच्या अंतर्गत येणा-या विषयांकरीता जर तो पात्र असेल तर तो निवडणूक लढवू शकतो.

३) राजीनामा दिलेल्या सदस्यांबाबत -जरी एखाद्या सदस्याने मध्ये बोर्ड ऑफ स्टडीज किंवा फॅकल्टीमधून राजीनामा दिला असेल ( दि. १२ मे, २००० नंतर ) तरी बोर्ड व फॅकल्टीची टर्म त्यामुळे संपुष्टात येत नाही. त्यामुळे या सदस्याला सलग दुस-या निवडणूकीत निवडणूक लढवावयाची असल्यास त्याच्यासाठी ही सलग दुसरी टर्म ठरते. व त्यामुळे त्यास अभ्यास मंडळाच्या अध्यक्षपदाकरिता असलेल्या निवडणूकीत भाग घेता येणार नाही.

आपली विश्वासू,
सुवर्णा खरात
( सुवर्णा सि. खरात )
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत,

संचालक, उ.शि., पुणे